

‘आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील’

कुणेनामा : विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीतांवर आकर्षक नृत्य व कवायत सादर करत उपस्थितांची दाद मिळविली.

लोणावळा, ता. १६ : आदिवासी समाजातील मुलांनी व्यवसायात अग्रेसर राहून समाजासाठी एक 'रोल मॉडेल' म्हणून पुढे यावे यासाठी प्रयत्नशील असल्याचे मत डेला अॅडव्हेंचरचे प्रमुख जिमी मिस्त्री यांनी केले.

कुणेनामा येथील डेला समूहाने दत्तक घेतलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या द्वितीय वर्धापन दिन व वार्षिक समारंभात ते बोलत होते. या वेळी लेफ्टनंट जनरल रेमंड नरोन्हा (निवृत्त), जिल्हा परिषद सदस्या अलका धानिवले, कुसुम काशीकर, पंचायत समिती सदस्य महादू उघडे, कुणेचे सरपंच संदीप उंबरे, उपसरपंच संजय ढाकोळ, रामदास पांडवे, सहादू मानकर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करणे, शाश्वत चरितार्थाचे साधन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सुसज्ज करणे व त्यायोगे त्यांचा भविष्यकाळ उज्ज्वल होण्यासाठी प्रयत्न करणे, ही माझी वैयक्तिक जबाबदारी असल्याचे मिस्त्री म्हणाले. सध्या या विद्यार्थ्यांना कौशल्याची गरज असून लोणावळा, खंडाळा परिसरातील स्थानिकांसाठी डेला संकुलात कौशल्य विकास केंद्र लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. लोणावळ्यात कौशल्याची कमतरता नाही. त्यातूनच नवे शिकण्याची, स्वयंविकास साधण्याची संधी मिळेल व चरितार्थाचे उत्तम साधनही ते प्राप्त करू शकतील, अशी आशा मिस्त्री यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास, तिरंदाजी, पोहणे, गायन, नृत्य, स्वसंरक्षणासाठी कराटेचे धडे देण्यात येत असल्याची माहिती या वेळी देण्यात आली. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमासह तिरंदाजीचे प्रात्यक्षिक दाखवत उपस्थितांची वाहवा मिळविली.